# ✻ कर्ज वितरणासंबंधी पाळावयाच्या अटी ✻

१) संस्थेची कमाल मर्यादा पत्रके मंजूर झाल्याशिवाय कर्ज वाटप केले जाणार नाही.

२) खरीप पिकांकरीता कर्ज वाटप १ एप्रिल २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत केले जाईल. रब्बी पिकांकरीता कर्ज वाटप १ ऑक्टोबर २०१७ ते २८ फरवरी २०१८ पर्यंत केले जाईल. तसेच दुबार पिकांकरीता कर्ज वितरण १ नोव्हेंबर २०१७ ते ३१ जानेवारी २०१८ पर्यंत केले जाईल.

३) शेतकरी सभासदांसाठी ''प्रधानमंत्री कृषि विमा योजना '' सुरु असून ही योजना कर्जदार शेतकरी सभासदास सक्तीची आहे.

४) थकबाकीदार सभासदांकडून वसूल झालेल्या संपूर्ण देय असलेला सरचार्ज संस्थेने बँकेत भरला पाहिजे.

५) सभासदांकडील पूर्वीचे संपूर्ण अल्प मुदती कर्ज आणि सर्व प्रकारच्या मुदती कर्जाचे येणे हप्त्याची रक्कम व त्यावरील व्याजाची परतफेड पूर्ण झाली पाहिजे. सदर रक्कम बँकेत नगदी भरल्यानंतर कमीतकमी ७ दिवसांचा कालावधी ठेवून नविन कर्ज देण्यात येईल. मात्र परस्पर वसुली देण्याचा सभासदांच्या बाबतीत किमान ३ दिवसाचा कालावधी असणे आवश्यक आहे.

६) संस्थेच्या व्यवस्थापक कमेटीवर थकबाकीदार सदस्य नसावा.

७) संस्थेच्या पोटनियमानुसार हातात ठेवण्याचे रोख शिल्लकेचे मर्यादेपेक्षा हातातील रोख शिल्लक जास्त असल्यास जादा रोख शिल्लक बँकेत भरल्याशिवाय कर्ज वाटप केल्या जाणार नाही. माजी अध्यक्ष, सदस्य अथवा गटसचिव यांचेकडील रोख शिल्लकेच्या येणे असलेल्या रक्कमेबाबत तसेच अफरातफरी बाबत कायदेशीर कार्यवाही केलेली असावी. अफरातफरी बाबत केलेल्या कार्यवाहीचा दाखला गटसचिव व संस्थेचे अध्यक्ष यांचे संयुक्त सहीनिशी अर्जासोबत जोडावा व तपासनीचे वेळी मुळ कागदपत्रे बँकेस उपलब्ध करुन द्यावीत.

८) कर्ज मागणी अर्जाची तपासणी करण्यासाठी रोकड, पावती पुस्तक, खतावणी, कारवाई (बुक्स)वगैरे संस्थेने बँकेच्या तपासणी करिता बोलविण्याचा अधिकार शाखेच्या अधिकारी वर्गास राहील.

९) शेतकी पतपेढ्यांचे सभासदांनी त्यांचे कर्जाचे रकमे इतक्या मालाची किमान विक्री सहकारी संस्थांमार्फत अथवा आधारभूत एकाधिकार खरेदी केंद्रामार्फत करुन परस्पर वसूली करुण देण्याबाबत करार संस्थेला करुन दिला पाहिजे.

१०) कमाल मर्यादा पत्रकात पिकाखालील जे क्षेत्र दर्शविण्यात आले असेल त्या सर्व जमिनिचे "ई" करार (डिक्लेरेशन) दिले पाहिजे.

११) कमाल मर्यादा (शासनाने दिलेल्या किंवा कुळात मिळालेली) जमिन धारण करणाऱ्या सभासदांना पिक उत्पादनाकरीता २ लायक जमानतदार घेवून कर्ज वाटप करता येईल. मात्र सदर सभासद थकीत झाल्यास त्याचे जमानतदार थकित समजले जावून त्यांना कर्जवाटप करता येणार नाही. सशर्त भूमिधारी जमिनीपैकी निर्वासितांच्या नांवाने जमिन झाली असेल त्यांना जमानदारांची आवश्यकता राहणार नाही. मात्र त्यांनी थकीत सभासदांची त्यांनी जमिन घेतली नसावी (याबाबत मुख्य का.प.क्र. कर्ज/निर्वासितांना कर्ज वाटप/५५८/८५-८६ दि. १३.३.८६ प्रमाणे कार्यवाही व्हावी)ट्रस्टी, देवस्थान, गौरक्षण वगैरे सारख्या खाजगी संस्थांना तसेच भूदानात मिळालेल्या जमिनीवर कर्ज मंजूर करता येईल. परंतू देवालय अगर ट्रस्टच्या मालकीच्या शेतीवर कर्ज वाटप करण्यापुर्वी मे. चॅरिटी कमिशनर यांचे कडून कर्ज वाटपास हरकत नसल्या बाबतचा दाखला सादर करावा लागेल, मात्र वैयक्तीक देवस्थानाचे, गौरक्षणाचे, वहीवाटदारास व भूदानात मिळालेल्या जमिनीवर दोन किंवा जास्त लायक जमानतदार घेऊन कर्ज देता येईल असे जमानतदार संस्थेचे सभासद असावयास पाहिजे व थकबाकीदार नसावे.

१२) " ई" करार करुन दिलेल्या जमिनीचे क्षेत्रापुरतेच कर्ज वितरण करावे. सिलींग मध्ये गेलेली जमीन "इ" करार पत्रकात येणार नाही हे पहावे.

१३) आधारभूत/एकाधिकार योजनेखाली खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या शेतमालाच्या रक्कमेतुन सभासदाकडील कर्जाची वसुली करुन घेण्याचा अधिकार बँकेला राहील.

१४) शेअर्स धारण करण्याची मर्यादा शासनाने व नॉबार्ड बँकेने ठरवून दिलेल्या सुचनेनुसार रु. २०,००० पर्यत खालील प्रमाणात राहील.

अ) लहान, अती लहान, आर्थिकदृट्या कमकुवत अशा सभासदांचे बाबतीत कर्जाचे प्रमाणात एकूण २.५० टक्के इतकीच भागधारणा राहील.

ब) इतर सभासदांच्या बाबतीत भागधारणा एकूण २०,०००/- पर्यंत राहील.

क) वरील प्रमाणे भागधारणा पूर्ण केल्यानंतर घेतलेल्या कर्जातून कपात केलेल्या शेअर्सची रक्कम सोसायटीकडे ठेव म्हणून राहील व ती बँकेत सभासद बचत ठेव खात्यात गुंतविली जाईल. ज्या संस्थांचे सभासद कर्ज व बँक कर्ज यामध्ये तफावत असेल अशा संस्थांच्या सभासदांची भागधारणा बँक सुचीत करील त्या प्रमाणात राहील. अशा प्रकरणात वरील अट क्र. १४ (अ) व (ब) यामध्ये दर्शविल्या कमाल मर्यादा लागू होणार नाही.

१५) संस्थेला बँकेकडून घेत असलेल्या एकूण कर्जाच्या शेकडा ५% इतकी रक्कम बँकेच्या भागभांडवलात गुंतविणे आवश्यक आहे.

१६) राष्ट्रीयकृत बँक /व्यापारी बँकेकडून अल्प मुदती शेती व्यवसायाकरीता कर्ज घेतलेल्या सभासदांना संस्थेमार्फत त्याच कामाकरीता कर्ज दिले जाणार नाही. मात्र इतर कारणाकरीता कर्ज घेतले असेल आणि असे कर्ज थकीत नसेल तर अशा सभासदांना अल्पमुदती शेती कर्ज वाटप करता येईल.

१७) संस्थानी आपली रिझर्व फंडाची पूर्ण रक्कम सहकारी बँकेत रिझर्व फंडाची गुंतवणूक म्हणून ठेवणे आवश्यक आहे. तसेच संस्थांना इतरत्र गुंतवणूक करतांना बँकेची व खात्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच संस्थांनी सर्व प्रकारची ठेव खाती जिल्हा सहकारी बँकेतच ठेवण्याचे बंधन राहील.

१८) बँक निरिक्षकाचे तपासणी अहवाल व सहकारी ऑडीटरचे ऑडीट नोट मध्ये दर्शविलेल्या दोषांचा दुरुस्ती अहवाल कर्ज उचल करण्यापुर्वी संस्थेनी बँकेला सादर केला पाहिजे. संस्थेचा रेकार्ड तपासण्याचा अधिकार जिल्हा सहकारी बँक, राज्य सहकारी बँक व नाबार्ड यांना राहील. तपासणीकरीता रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१९) रोख कर्जाचे वाटप चेकद्वारे करावयाचे असल्यामुळे सभासदांना कर्ज मंजूर झाल्याबाबत सुचना देणे आवश्याक आहे. अशा सुचना देतांना मंजूर झालेले कर्ज शेअर्सपोटी झालेली कपात, कर्ज परतफेडीची तारीख, व्याजदर व दंड व्याज दर इत्यादी माहिती समाविष्ठ करावी लागेल. ह्या सुचना संबंधीत सभासदांना सहकारी संस्थांनी द्यावयाच्या आहेत. बँक निरीक्षकयांनी हे काम न चुकता करवून घ्यावे.

२०) कर्ज मंजूर करण्यासंबंधीचा कार्यकारी मंडळाचा ठराव, कर्ज उचलण्यासंबंधीची व अटी मान्यतेबाबतची कागदपत्रे कर्जाची उचल करण्यापूर्वी बँकेस देणे आवश्यक आहे.

२१) ज्या संस्थेकडे बँकेचे कर्ज सभासदांकडील कर्जापेक्षा अधिक आहे अशा संस्थेला संबंधीत उपव्यवस्थापक कर्ज प्रमुख कार्यालय यांचे परवानगीने वाटप करता येईल.

२२) ज्या संस्थेतील पदाधिकारी जप्तीचे वेळी वसुली अधिकारी व बँकेचे अधिकारी यांना सहकार्य करणार नाहीत अशा पदाधिकाऱ्यांचे कर्ज वाटप प्रमुख कार्यालयाचे आदेशानुसार केले जाईल. या संबंधीची माहिती वेळचेवेळी केंद्र कार्यालयास संस्थेनी/ शाखेंनी द्यावी

२३) कर्जाच्या अटी, नियम तसेच बँकेचे व सहकारी खात्याचे आदेश संस्थेने व पाळल्यास संस्थेचा कर्ज पुरवठा स्थगीत ठेवण्याचा अधिकार बँकेस राहील. त्यामुळे सभासदांचे अगर संस्थेचे काही नुकसान झाल्यास पंच कमेटी त्यास जबाबदार राहील.

२४) सभासदांची कर्ज वसुलीची संपूर्ण रक्कम संस्थेचे बँक कर्जातच जमा करावी. बँकेचे पुर्व परवानगी शिवाय वसुलीची रक्कम अन्य कोणत्याही व्यवहारात संस्थेला गुंतविता येणार नाही.

२५) कर्जावरील व्याजाची रक्कम संस्थेला ३१ मार्च/३० सप्टेंबरच्या आंत बँकेत भरावी लागेल. व्याजाची रक्कम संस्थेने नगदी न भरल्यास बँकेत असलेल्या (मुदती ठेव वगळता) इतर कोणत्याही प्रकारच्या ठेव खात्यास ती रक्कम नावे टाकून वसुल करुन घेण्याचा अधिकार बँकेस राहील.

२६) अज्ञान व्यक्तीचे नांव सभासद म्हणून क.म. पत्रकात दाखल करु नये कारण तो संस्थेचा सभासद होवू शकत नाही. तसेच अज्ञान पालन कर्त्यास देखील अज्ञानाचे नांवाने असणाऱ्या शेतीवर कर्ज वाटप केले जाणार नाही. मात्र अज्ञान पालनकर्ता त्या जमिनीवर सामायिक भागीदार असल्यास अज्ञान पालन कर्त्याला कर्ज देता येईल.

२७) बँकेतून कर्ज घेणाऱ्या सभासदांचे जवळचे नातलग सावकारीचा व्यवहार करत असेल तर अशा सभासदांना संस्थेतून कर्ज दिले जाणार नाही.

२८) ''इ'' करार पत्रकारतील बोझाची नोंद तलाठ्याचे रेकॉर्डला होणे आवश्यक आहे. नोंदी करीता ''इ'' करार पत्रके प्रथम तलाठ्याकडे पाठविण्याची व्यवस्था संस्थेंनी /बँकेनी करावी, तसेच त्या संबंधी कर्ज वितरणापुर्वी खात्री शाखा निरिक्षकांनी प्रत्यक्षात करुन घ्यावी.

२९) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे वकलम १०१ (१) अन्वये सर्व थकबाकीदार सभासदांविरुध्द कायदेशिर कार्यवाही केलली असावी. तसेच याबाबतच्या माहितीचे रजिस्टर अद्यावत लिहून संस्थेच्या दप्तरी ठेवण्यात यावे.

३०) शासन, नाबार्ड, व राज्य सहकारी बँक यांचे धोरणानुसार संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व खातेदारांना संस्थेचे सभासद करुन घेवून त्यांच्या मागणीनुसार कर्ज वितरण करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. याबाबत या बँकेच्या मा. संचालक मंडळाचे निर्णयानुसार कर्ज मंजूर केले जाईल.

३१) सभासदांना कर्ज वितरण करतांना त्योकडून आवश्यक ती कागदपत्रे (कायदा व पोटनियमानुसार) दाखल करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील. सभासदांकडून दाखल करुन घेण्यात आलेले सात-बारा व डिक्लेरेशनची (नमुना'ल' फार्म व 'इ' करार) एक प्रत बँकेस संस्थेला दाखल करावयाची आहे.

३२) बँकेच्या व सहकारी खात्याचे पुर्व परवानगी शिवाय संस्थेस सभासद भाग भांडवल परत करता येणार नाही. तसेच संस्थेच्या कर्ज वसूलीच्या रकमा कायम स्वरुपी गुंतवणूकीसाठी (उदा, इमारत, जमिन खरेदी, गोदाम बांधकाम, डेडस्टॉक खरेदी व इतर संस्थांचे भाग खरेदीसाठी) द्विनीयोग करता येणार नाही.

टिप -: मॉडेल बॉयलॉज नुसार कर्ज वाटप करतेवेळी पहिल्या वर्षी कर्जाचे शेकडा १०% प्रमाणे व पुढील २ वर्षे शेकडा ५% प्रमाणे व त्यानंतर शेकडा २.५० प्रमाणे भागाची रक्कम कापून घेतली जाईल व ती रक्कम त्यांच्या भाग खात्यात जमा केली जाईल. मात्र ती रक्कम रु. २०,०००/- पेक्षा जास्त असणार नाही.